# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.03.2026** **वार- मंगळवार**

---

**एचपीव्ही**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय सरकारतर्फे महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी देशव्यापी ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस' म्हणजे एचपीव्ही विषाणू प्रतिबंधात्मक लसीकरण कार्यक्रम सुरू झाला. पुण्यात बोपोडीतल्या द्रौपदाबाई खेडेकर दवाखाना, लायगुडे दवाखाना, शिवाजीनगर मधला दळवी दवाखाना तसंच कमला नेहरू रुग्णालय इथं 14 ते 15 वयोगटातल्या मुलींना ही लस देण्यास प्रारंभ झाला आहे. महापालिकेच्या 21 प्रसूतिगृहांमध्ये ही लस उपलब्ध असून सकाळी 9 ते दुपारी २ या वेळेत लसीकरण केलं जाणार आहे. पिंपरीचिंचवड महानगरपालिकेच्या वतीनंही लसीकरण मोहिमेला सुरवात करण्यात आली. दरम्यान, या लशीबाबत गैरसमज पसरवणारे संदेश काहींनी समाजमाध्यमांवर टाकल्याची गंभीर दखल आरोग्य विभागानं घेतली असून त्यांना समज देण्यात आली आहे. ही लस सुरक्षित, प्रमाणित आणिवैज्ञानिकदृष्ट्या प्रभावी असल्यानं पालकांनी आपल्या मुलींचं लसीकरण वेळेत करूनघ्यावं,असं आवाहन महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून करण्यात आलंआहे.

**संसद-मेधा कुलकर्णी**

देशातल्या वाढत्या रस्ते अपघातांच्या गंभीर समस्येकडे सरकारनं तातडीनं लक्ष देऊन कठोर उपाययोजना कराव्यात, अशीमागणी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत शून्यकालात केली. बेफिकीर वाहनचालक, मद्यपान करून वाहन चालवणे तसेच सोशल मीडियासाठी रस्ते आणि महामार्गांवर रील किंवा फोटोशूट करण्याची वाढती प्रवृत्ती ही अपघातांची नवी आणि चिंताजनक कारणे ठरत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**जिल्हाधिकारी-अभियान**

शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवण्यासाठी त्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचं आर्थिकसक्षमीकरण करण्याच्या दृष्टीनं दिशा कृषी उन्नती अभियान महत्वाचे आहे. हे अभियानयशस्वी करण्याकरिता गाव पातळीवर शेतकऱ्यांचे गट तयार करा, प्रशिक्षित शेतकऱ्यांमधूनच गावातच मुख्य प्रशिक्षक तयार करातसंच निर्यातदारांची साखळी तयार करुन शेतकऱ्यांना निर्यातक्षम कृषी उत्पादनघेण्यासाठी कृषी विभागानं सुक्ष्म नियोजन करावं, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या. जिल्ह्यात'दिशा कृषी उन्नतीची- २०२९' हा आराखडा राबविण्यात येत आहे. या संबंधीच्या चर्चेदरम्यान डुडी बोलत होते.

**बालगंधर्व**

पुणेमहापालिकेच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात शहरातील सांस्कृतिक विभागासाठी मोठी निधीतरतूद करत पाच नवीन मिनी नाट्यगृहे आणि १५ नवीन कलादालनांच्या उभारणीचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. तसंच बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकास आणि आधुनिकीकरणाचा प्रकल्पही अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत आधुनिकरंगमंच,ध्वनी-प्रकाश व्यवस्था, कलाकारांसाठी सुधारित सुविधा आणि प्रेक्षकांसाठी आधुनिक सोयी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अर्थसंकल्पात समावेश झाल्यामुळे अनेकवर्षांपासून प्रलंबित असलेल्या या कामांना आता गती मिळण्याची शक्यता व्यक्त केलीजात आहे.

**साविक्रीबाईफुले विद्यापीठ**

स्त्रीशिक्षणाचा पाया रचणाऱ्या पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आज विविध ठिकाणी आदरांजली वाहण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पुतळ्यासकुलगुरू प्रा. डॉ सुरेश गोसावी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. या प्रसंगीशैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतरसेवक, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**साखरहंगाम**

राज्यातला यंदाचा साखर हंगाम संपण्याच्या मार्गावर असून यंदा सुरू झालेल्या २१० सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांपैकी आतापर्यंत १२६ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. राज्यात आतापर्यंत १ हजार १० लाख टन उसाचे गाळप झाले असून, सुमारे ९६ लाख टन साखरेचं उत्पादन झालं आहे. सर्वाधिक २३लाख टन उत्पादन कोल्हापूर विभागातून झालं असून पुणे विभागात २१ लाख टन साखरेचंउत्पादन झालं आहे.

**सरस**

पुणेजिल्हा परिषद आयोजित “मिनी सरस सावित्री जत्रा २०२६” या जिल्हास्तरीय विक्री आणि प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. स्वयंसहाय्यता समूहांच्या महिलांनी तयार केलेल्या विविध दर्जेदार उत्पादनांना या माध्यमातून व्यापक बाजारपेठ उपलब्ध होत असून महिला सक्षमीकरणाला चालना मिळत आहे. या जत्रेला काल युगांडासरकारच्या शिष्टमंडळानं विशेष भेट दिली. ग्रामीण संस्कृतीचा वसा आणि महिलांच्या उद्योजकतेचा वारसा जपणारी ही “मिनी सरस सावित्रीजत्रा २०२६” पुणेकरांसाठी उद्यापर्यंत खुली राहणार आहे.

**पोरशे**

पुण्यातीलकल्याणी नगर येथील पोर्शे कार अपघात प्रकरणात आरोपी अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अग्रवाल यांना आजसर्वोच्च न्यायालयाने काही अटींवर जामीन मंजूर केला आहे. या अपघातात दोन तरुणसॉफ्टवेअर अभियंत्यांचा मृत्यू झाला होता. न्यायमूर्ती BVNagarathna आणि UjjalBhuyan यांच्या खंडपीठाने हानिर्णय दिला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतसह विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता. नमस्कार.**